# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. १०/२०२२**

**विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय संशोधन केंद्रातील पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२१**

**विषय : पीएच.डी. मुलाखतींसाठी उमेदवार यादी व विद्यार्थ्यांसाठी केंद्र बदलण्याच्या मुदतवाढीबाबत...**

**संदर्भ :** १. विद्यापीठ परिपत्रक क्र. ३८३ संदर्भ क्र. शै. प्रवेश/४७३८, ४७३९, ४७४० दि. २९/१२/२०२१.

२. विद्यापीठ परिपत्रक क्र. ०१ संदर्भ क्र. शै. प्रवेश/५६ दि. ०४/०१/२०२२.

कृपया वरील संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन करावे, संबंधीत विद्यापीठ संलग्नित संशोधन केंद्रांनी अद्ययावत केलेल्या विषयनिहाय — मार्गदर्शकनिहाय आरक्षित जागांबाबतची माहिती दि. १२/०१/२०२२ पासून विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, सदर उपलब्ध जागांच्या अद्ययावत माहिती नुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीन मधून ऑनलाइन पद्धतीने दि. १३/०१/२०२२ पासून दि. १७/०१/२०२२ पर्यंत केंद्र बदलण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सर्व संलग्नित संशोधन केंद्रांना **दि. १८/०१/२०२२** पासून महाविद्यालय BOD लॉगीन मध्ये संबंधित संशोधन केंद्रासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यानुसार सदर यादीतील विद्यार्थ्यांना संशोधन केंद्रांनी त्यांच्या स्तरावर ई—मेल किंवा दूरध्वनीद्वारे, तसेच संशोधन केंद्राच्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर मुलाखतीच्या वेळापत्रकाबाबत माहिती प्रसिद्ध करावी. सदर पीएच.डी. प्रवेश मुलाखतीची प्रक्रिया आवश्यकतेनुसार ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने कोव्हीड—१९ चे आवश्यक त्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करुन राबविण्यात यावी.

संशोधन केंद्रांनी मुलाखत पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीचा अहवाल दि. ०८/०२/२०२२ पर्यंत विद्यापीठास सादर करावा. मुलाखतीची प्रक्रिया राबविण्या संबंधिच्या इतर सविस्तर सूचना संदर्भीय परिपत्रकानुसार प्रसिद्ध करण्यात आल्याप्रमाणेच राहतील.

उपकुलसचिव
**शैक्षणिक प्रवेश**

संदर्भ क्र. शै.प्रवेश/ १७७
दिनांक : १२/०१/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

मा. प्राचार्य/संचालक सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्था.